International Journal of Leading Research Publication (IJLRP)
E-ISSN: 2582-8010 ● Website: www.ijlrp.com ● Email: editor@ijlrp.com

# मराठी लेखिकांच्या कथांमधील लोकजीवनाची विविधांगे

## उन्नती संजय चौधरी

**मु. पो. खिरोदा , ता. रावेर, जि. जळगाव**
**पिन- ४२५५०४**

**सरांश**

मानवी समाज लोकसंस्कृती व लोकजीवन यासंबंधीच्या विविध घटकांनी बनलेला आहे. अनेक प्रकारच्या रूढी परंपरा चालीरीती, सण उत्सव, समाज धर्म, शिक्षण अर्थकारण राजकारण अशी संस्कृतीची विविध घटकांगे, तसेच श्रद्धा व समजूती, अशा अनेक प्रकारच्या परंपरागत रीतीने चालत आलेल्या गोष्टींमुळे लोकजीवन बनलेले आहे. लोकजीवन हे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि अन्य सांस्कृतिक जीवनमूल्यांनी प्रभावीत झालेले असते. रूढी,परंपरा,श्रद्धा,समजुती या गोष्टींच्या बाबतीत सनातन मानसिकताही बनून राहिलेली असते. त्याविषयीचे लोकजीवनात विशेष मूल्ये बनलेली असतात. त्यातून लोकमानस घडलेले असते. लेखक हा समाजातील एक घटक असल्याने त्या जीवनाचा तो साक्षीदार असतो. त्याच्याही मनावर त्याचा प्रभाव पडलेला असतो. त्याच्या अनुभवाची अभिव्यक्ती करीत असताना लोकजीवनाचे विविध पैलू त्याच्या साहित्यातून प्रकट होत असतात, त्याचाच एक भाग म्हणून विदर्भातील लेखिकांच्या कथांमधील लोक जीवनाची विविध आयाम लक्षात घेऊन त्याचे स्वरूप या ठिकाणी स्पष्ट करण्यात आलेले आहे.

## ➢ प्रस्तावना

लेखक सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांनी बनलेल्या लोकजीवनाचा एक भाग असतो.तो त्या जीवनमूल्यांचे भान राखून लिहितो, तेव्हा त्याच्या समकालीन लोकजीवनाचे दर्शन त्याच्या साहित्यकृतीतून घडल्यावाचून राहत नाही. विशेषतः " माणूस हा त्याच्या भोवतालची परिस्थिती,त्याने आजूबाजूचं पाहिलेलं जीवन,त्याचे त्याने लावलेले अर्थ आणि ठराविक अर्थाच्या बाहेर पडून योग्य त्या दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहण्याची कुवत-शक्ति त्याप्रमाणे घडत असतो."असे स्नेहलात चौधरी यांनी म्हटले आहे.लेखक राहत असलेल्या प्रदेशाचे जीवन तो अनुभवतो व त्याचे साहित्य निर्माण करतो,म्हणून "प्रादेशिक साहित्यकृतींच्यामध्ये लोकजीवनातील श्रद्धा, रुढी,परंपरा, लोकसमजुती, दैवत विश्वास व लोकविधी या विविध घटकांचे प्रबळ रूपात दर्शन घडते " लोकमानसातील श्रद्धा समजुती, शकुन अपशकुन, भ्रम संकेत, उत्सव,सण, लोक रुढी, लोकदैवते यासारख्या गोष्टींनी लोकजीवन व्यापलेले असते. त्याकडे साहित्यातील जीवनमूल्ये म्हणून पाहता येतेत्यानुषंगाने काही मराठी लेखिकांच्या कथांमधून त्यांनी लोकजीवनाचे चित्रण केलेले दिसून येते.

**सुप्रिया अय्यर :** यांनी 'काळीज' कथेमधून समाजात निर्माण झालेल्या वर्गभेदाचे चित्रण केले असून उच्चवर्णीय पांढरपेशा लोकांमुळे सर्वसामान्य माणसाचे होणारे हाल, यावर प्रकाश टाकला आहे.समाजात अग्रस्थानी असलेल्या विशिष्ट वर्गातील लोकांचे हितसंबंध इथे साधले जातात. त्यांच्या ठिकाणी सामाजिक निष्ठा व बांधिलकी याचा अभाव असल्याचे लेखिका स्पष्ट करतात. म्हणजे समाजातील आरोग्यविषयक समस्या यातून लक्षात येते.

'बाणातला न म्हण' ही कथा शिक्षण क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाची नोंद करणारी आहे. अध्ययन अध्यापनाच्या बाबतीत विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील जागरूकता येथे दिसून येते. शाळा आणि

अभ्यासाच्या बाबबतीत मुलाकडे पाहण्याचा दृष्टिकोणही दिसतो. 'सोनेरी वर्खाचे बिल्लोर' या कथेत राजकारणी, पुढारी आणि अधिकारी वर्ग सर्वसामान्य जनतेच्या समस्यावर काम न करता त्यांची उपेक्षा करतात. 'कन्या कोलम' या कथेतून देवीचे वार, श्रद्धा आणि पूजाअर्चा करून देवाला साकडे घालणारे लोकमानस प्रकट होते. 'डाल्या डोळ्याच गुपित' या कथेतील अभिलाषशी गणपतीचा डावा डोळं बोलतो, म्हणून तो डोळा त्याला खूप आवश्यक वाटतो. त्यातून विज्ञाननिष्ठा व लोकसमजूत यावर प्रकाश टाकलेला आहे. 'भदे ईन डिलिव्हर्ड नाऊ' या कथेत स्वप्नविषयक लोकमानस प्रकट करताना कथेली नंदा स्वप्नात तिच्या नवऱ्याला गर्भधारणा होऊन मुलगी जन्माला आल्याचे पाहते. अर्थात स्त्रित्वाच्या ज्या ज्या त्रासदायक गोष्टी असतात. त्या पुरूषांच्या वाट्याला आल्या तर काय घडू शकते, याची विनोदी मांडणी लेखिकेने खेळकरपणे केलेली दिसून येते.

'मन्नालालच्या बुढीचा भाऊ' या कथेत पुनर्जन्मविषयी लोकविश्वास असल्याचे सांगितले आहे. तर 'लवंगी मिरची' या कथेतील नियोजित व रूढी परंपरेप्रमाणे इंजिनिअर तरूण बस्त्यापासून तर घरगुती वापराच्या काही वस्तूपर्यंत जे जे हवे ते ते होणाऱ्या सासऱ्याच्या पैशांनी खरेदी करतो. मुलाच्या आवडीनिवडी व इच्छेप्रमाणे खरेदी होत नाही. म्हणून तो नियोजित वधूला अडाणी ठरवून लग्न जमणार नाही, असं मध्यस्थी व्यक्तीला सांगतो.अशी वधूपक्ष व वरपक्ष यांच्या मनावरील रूढी परंपरेचा प्रभाव यातून साकार होतो. आणि समाजात वैवाहिक रूढीमुळे वधूपक्षाचा कनिष्ठ दर्जा लक्षात येतो.

'किनपाखी मोर' कथेत वयाच्या पंधराव्या वर्षीच विधवा झालेल्या अल्पवयीन मुलीचे केशवपण करण्याविषयी लेखिकेने अनिष्ठ परंपरेवर प्रकाश टाकलेला आहे. शिवाय तिचं अपशकुनी दर्शन घरातील सारेजण वर्ज्य ठरवतात,अशी विधवा स्त्रीबाबत प्रथा व तिच्याविषयीची समजूत लेखिकेने अधोरेखित केली आहे.अशाप्रकारे समाजातील श्रद्धा, समजुती, लोकमानस, वर्गीय भेद आणि रूढी परंपरा यावर प्रकाश टाकून त्याचे स्त्रीजीवनावर होणारे परिणाम लेखीने अधोरेखित केले आहे.समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण तिला त्रासदायक असल्याचे सांगितले आहे.

**माधुरी आशिरगडे** यांनी 'ईश्वरी' या कथेत सर्वसामान्य मोलकरीणच्या आरोग्याचे प्रश्न मांडलेले केले आहेत.अज्ञान व दारिद्रयामुळे कनिष्ठ वर्गातील समाजामध्ये निर्माण झालेल्या आरोग्यविषयक प्रश्नाचे स्वरूप या कथेतून स्पष्ट होते. 'मनं वढायं वढायं' या कथेत समाजाने ठरवून देलेल्या वैवाहिक नीती-नियमांचे व्यक्तीच्या जीवनावर झालेले परिणाम लेखिकेने सांगितले आहे. तरुण विधवा मामी आणि तिच्यापेक्षा लहान असलेला तिचा तरुण सावत्र भाचा यांच्यामध्ये परस्पर शारीरिक आकर्षण असते. मानस हा तिच्याशी लग्न करण्याचा विचार करतो, परंतु नातेसंबंध आड येतात, त्यामुळे ती नकार देते आणि एका विधुराशी लग्न करायचे ठरविते. 'वारिणी' या कथेतील निपुत्रिक वारिणी माताजीच्या आहारी जाऊन मुलबाळ होण्यावर विश्वास ठेवते. प्रत्यक्षात काही मुलबाळ होत नाही. मुलबाळ होण्यासाठी ती मंत्रतंत्रचा मार्ग अवलंबते. त्यातून समाजात असलेल्या अंधश्रद्धा, लोकमानस व लोकसमजूती याचे दर्शन घडते. 'प्रियाव्रता' कथेतील विवाहित नायिका स्त्रीपुरुष संबंधाच्या बाबतीत सामाजिक विधिनिषेध न पाळता पुरुष अर्थात पतीइतकेच सहसंबंधाचे स्वातंत्र्य भोगते आणि प्रस्थापित व्यवस्था आणि सामाजिक मानसिकता याला ती धक्के देते**.** अशी मांडणी लेखिकेने केलेली आहे.

**प्रतिमा इंगोले** यांनी 'अमंगल युग' संग्रहातील 'झेंडावंदन' कथेत १५ ऑगस्ट कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेचा शालेय शिक्षणातील भ्रष्टाचार व राजकारण यामुळे ग्रामीण शिक्षणाची झालेली वाताहत यावर प्रकाश टाकलेला आहे. 'संस्थाधीश' कथेतील मोठ्या शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब आत्मसन्मान, प्रसिद्धी, लोकमान्य प्रतिष्ठा आणि राजकीय सत्ता, यासाठी हरिभक्त परायणचं सोंग घेतो. खोटेनाटे करून धुर्तपण स्वतःचे शिक्षण व ध्येय पूर्ण करतो. स्वतःच्या फायद्यासाठी लोकांच्या अंधश्रद्धेला खतपाणी घालतो. वैज्ञानिक कीर्तनाची नवी शक्कल लढवतो. त्यांच्या धार्मिक भावना, श्रद्धा व समजुतीचा फायदा घेऊन राजकारण करतात. कीर्तन करून

लोकांमध्ये प्रसिद्धी मिळवून बापूसाहेब सोसायटीच्या निवडणुकीची तयारी करतात. कीर्तनाचे दौरे करून लोकसंग्रह वाढवतात. खासदारकीची स्वप्नेही पाहतात. अर्थात समाजातील ढोंगी लोक व व्यक्तीपूजा याचे चित्रण येथे केलेले आहे.

'निवडणूक' कथेत नगरपरिषदेच्या निवडणूका होतात**.** महिलांसाठी राखीव असलेल्या वार्डात अरूणला एक प्रामाणिक उमेदवार हवा असतो,म्हणून त्याचा मित्र असलेल्या मधुच्या बायकोला तो उभा करतो. ती बोलण्यात, व्यवहारात निष्णात व दिसण्यात प्रभावी असते.तिच्या प्रचारासाठी राजकीय नेते आमदार हेही सक्रीय होतात. त्यामुळे सत्तारूढ पक्ष विरूद्ध नवा पक्ष असे अटीतटीचे वातावरण निर्माण होते. त्याच्या बाजूने आमदार असतो.तरी जवळच्याच कार्यकर्त्यांच्या अहंकार व आगाऊपणामुळे ती महिला उमेदवार पराभूत होते. 'पदवीदान' कथेत ज्ञान, विज्ञान व शिक्षण क्षेत्रात मानवाने खूप प्रगती केली. सुखसुविधा वाढल्या. विद्यापीठे स्थापन झालीत मात्र समाजात भ्रष्टाचार वाढला,अशी मांडणी केलेली आहे.'अमंगलयुग' कथेत सामाजिक परिवर्तन होत असताना मानवी मूल्यांचा ऱ्हास होत जातो आहे,असे सांगितले आहे.

'येळी माय' संग्रहातील 'येळी माय' या शीर्षक कथेत सावकाराच्या ताब्यात तीन वर्षासाठी शेती देऊन भुलोजी त्याच्या मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढतो. पण त्याच्या मुलीला तिच्या सासरची माणसे न नांदवता दोन वर्षात टाकून देतात. तो सावकराच्या ताब्यातील शेती सोडवून पेरणी करतो.मात्र पाऊस येत नाही, म्हणून त्याची अस्वस्थता वाढते. अशाप्रकारचे सामान्य शेतकऱ्याच्या जीवनातील सामाजिक व आर्थिक प्रश्न लेखिकेने मांडलेले आहे. 'पाखुरवाळा' या कथेतील पदवीधर असलेल्या सुमनच्या लग्नाला दहा वर्षे होऊनही मूलबाळ होत नाही, म्हणून ती आईच्या आग्रहाखातर एका महाराजकडे जाते. त्यांना सिद्धी प्राप्त झाल्याचा लोकसमज समाजात पसरलेला असतो. महाराज तिला करणी केल्याचे सांगून पाच आठवडे त्याच्याकडे बोलवतो.त्याच्या सांगण्याने ती जाते. घरात दिसलेल्या कावळ्याच्या जोडीला पाहून तिला अशुभ वाटतं,पण कावळ्यांबाबत समाजात अशुभ अशी धारणा असली तरी शिक्षित सुमनबाई स्वतःच्या मनाची समजूत घालते.अशी मांडणी करून समाजातील शुभ-अशुभविषयीचे लोकमानस व लोकश्रद्धा यावर लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. अशाप्रकारे प्रतिमा इंगोले यांनी त्यांच्या कथांमधून समाजजीवनातील श्रद्धा, समजुती, लोकमानस, रूढी व परंपरा याचे चित्रण केले आहे आणि समाजिक,राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात होत गेलेल्या मानवीमूल्यांचे अध:पतनही अधोरेखित केलेले आहे.

**विशाखा कांबळे** यांच्या 'डिवोशन' कथेतील वर्षाचे वडील दुसऱ्याच्या शेतावर काम करतात. कुटुंबाची गुजराण होत नाही.गावात शिक्षणाच्या सुविधा नसतात, म्हणून तिचे वडील शहरात जातात. सायकल रिक्षा चालवून कुटुंबाची गुजराण तर करतातच,मुलांच्या शिक्षणसाठीही धडपडतात. वर्षा ही प्रेमविवाह करू पाहते,पण घरची मंडळी तिला विरोध करते.एकूणच शैक्षणिक,आर्थिक जीवनासह वैवाहिक रूढी परंपरा व तरुण तरुणीकडे समाजाचा, कुटुंबाचा पाहण्याचा दृष्टिकोण याचे दर्शन यातून घडते. 'रोवर' कथेतील जयसेन दिवसभर वर्धा नदीत नाव चालवून कुटुंबाचा चरितार्थ भागवितो. त्याचा चौदा वर्षाचा मुलगा मित्रसेन शाळा सुटली की आपल्या वडिलांच्या नावेवर नाव हाकलायला जातो. जयसेन काही दिवसांनी आजारी पडल्यानंतर मित्रसेन त्याच्या गैरहजेरीत नाव चालवून पैसे आणतो. अहोरात्र मेहनत करून वडिलांच्या दवाखान्याचे बील चुकवितो. तो सैन्यात नोकरीला लागतो,नंतर ती नोकरी सोडून देतो.या चित्रणातून लेखिकेने दारिद्य, शिक्षण,नोकरी आणि आरोग्यविषयक प्रश्न मांडलेले आहे.

'स्ट्रगल' कथेतून तरुणाची नोकरी,व्यवसाय व सामाजिक मानसिकता, याची मांडणी केली आहे.'ब्लाईड लॉं ' या कथेत गावातील वर्गीय भेदातून निर्माण झालेले आर्थिक,शैक्षणिक व स्रीविषयक प्रश्न सांगितले आहेत.'फिंगर प्रिन्ट' या कथेत लेखिकेने शैक्षणिक व आर्थिक स्थिति बाबत सुस्थितीत असलेल्या व्यक्तिजीवनाचे दर्शन घडवून त्यांच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोण प्रकट केलेला आहे. खेड्यातील सधन शेतकरी

वर्ग,शिक्षण व उच्च पदस्थ सन्मानाची नोकरी याचे दर्शन घडते.'लिव्हिंग रिलेशनशीप' कथेत शिक्षण,स्वावलंबन,स्त्रीपुरुष संबंध याबाबत समाजात असलेल्या धारणा आणि त्याचा विचार न करणारी तरुण पिढी, यावर प्रकाश पडतो.

'कटेसी' या कथेत शिक्षण व नोकरी यासाठी धडपडणाऱ्या तरुणांचे चित्रण केले आहे. 'गोंडी स्टेट' या कथेत आदिवासी गोंड जमातीतील पोटजातीतील भेदाभेदमुळे त्यांच्यात बेटी व्यवहार होत नसल्याचे दिसून येते. 'डान्सर' या कथेत गावातील तमासगीर स्त्री, उच्च शिक्षण घेणारी तिची मुलगी आणि त्यांच्याशी संबंधित श्रीमंत पुरुष व त्याची मुलगी यांच्या चित्रणातून सामाजिक स्तर, शिक्षण, राजकारण यावर लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. अशाप्रकारे विशाखा कांबळे यांनी शैक्षणिक,आर्थिक आणि सामाजिक जीवनाकडे नव्या तरुण पिढीचा पाहण्याचा दृष्टिकोण त्यांच्या कथांमधून प्रकट केलेला आहे.

**मोहना कारखानीस** यांनी 'जाईचा मांडव' या संग्रहातील शीर्षक कथेत लैंगिक अत्याचार झालेल्या वेडसर तरुणीकडे समाजाचा पाहण्याचा दुष्टिकोण अधोरेखित केलेला आहे. 'गुंतता ह्रदय हे' या कथेत केवळ विकलांग बहिणीमुळे कथेतील नायिकेला कोणीही स्थळ म्हणून पसंत करत नाही. कारण समाजात विकलांग, मंदबुद्धी मुले ही बांडगूळ समजली जातात. तिच्या आईचा एकटेपणा, अगतिकपणाही तिच्या लग्नाला अडसर ठरतो. तेव्हा तिला समाजाची चीड येते. 'माय' या कथेत वर्गीयभेद व सामाजिक स्तर अधोरेखित करताना लेखिकेने ग्रामीण शहरी व कष्टकरी नोकरदार यांचा तुलनात्मक विचार मांडलेला आहे. 'पिझ्झाहट' कथेतही सामाजिक व आर्थिक विषमतेचे चित्रण करून लेखिकेने तरूण पिढीतील संवेदनशीलता अधोरेखित केली आहे. 'फुटपाथ : शेवटचा श्वास' या कथेतही लेखिकेने आर्थिक विषमता व सामाजिक स्तर यातील फरक सांगितला आहे. मध्यमवर्गीय माणसे व कार्यकर्ते फुटपाथवासीयांकडे येऊन 'गरिबी हटावो'च्या घोषणा करतात. चांगले कपडे वाटून जातात. 'शाळेचे महत्व' पटवून सांगतात. मात्र सामान्य माणसाच्या आयुष्यात काही फरक पडलेला नसतो.

'पैंजण' संग्रहातील 'मॉल' या कथेतही वर्गीयभेद अधोरेखित करून श्रीमंताच्या भपकेबाज विश्वात आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या कनिष्ठ वर्गातील लहान मुलांच्या उपेक्षित भावनांचे रेखांकन केले आहे. समोरच्या आकर्षक गोष्टी आपल्याला मिळू शकत नाही किंवा मिळवता येणार नाही, या जाणिवेने परिस्थितीचे भान राखून गरिबांची मुले लहानवयातच प्रौढ बनतात.शिवाय मजुरी करूनही त्यांची उपेक्षा व उपासमार होते तर दुसरीकडे मध्यमवर्गीय समाजातील आई मुलाला बाहेरचे पदार्थ आग्रहाने खाऊ घालते,पण त्याला भूक नसते,अशी परस्पर विसंगती यातून रेखांकित केलेली आहे. 'वेगळी वाट' कथेतील कुटुंबातील कर्त्या पुरूषांचे निधन होते. एकाला पक्षाघात होतो.कुटुंबाच्या चरीतार्थाची जबाबदारी भीमाबाईवर येऊन पडते. ती दुःखी ,हतबल व निराश न होता तीन मुली व सासू यांची जबाबदारी ती उचलते, तिला गावात काम मिळत नाही. तेव्हा न्हाव्याचा परंपरागत व्यवसाय सुरू करते.अर्थात व्यवसायाबाबत स्त्रीपुरुष भेद दूर करून आर्थिक प्रश्न सोडविण्यावर येथे प्रकाश पडतो. 'सामोरी' कथेतील समाज घटस्फोटीत स्त्रीच्या कर्तृत्वावर, स्वभावावर आणि वागणुकीवर विश्वास ठेवत नाही. तिला नावे ठेवतो. 'अग्निदिव्य' कथेत कनिष्ठ व मध्यमवर्गीय माणसांचा सामाजिक स्तर व वर्गीय भेद लेखिका रेखांकित करतात.

**सुनिता कावळे** यांच्या 'ब्याद' कथेतील नायिका शाळेत नोकरी करते . तिचा नवरा कामधंदा न करता व्यसनाच्या आहारी जातो. तिला त्रास देतो. तिच्या शाळेत जाऊन तेथे गोंधळ घालतो. तिच्या बाजूने कोणीच बोलत नाही. मुख्याध्यापक तिला घरी पाठवतात. समाज तिची काही चूक नसताना ब्याद असल्याचे हिनवतो.'उसवलेलं आभाळ' कथेतील कुष्ठ रोगी तरुणीच्या बाबतीत समाज तिच्यापासून दूर राहतो आणि तिच्या कुटुंबलाही राहायला सांगतो.यातून कुष्ठ रोग्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोण लेखिकेने प्रकट केलेला आहे. तसेच 'एकला चलो रे' या कथेतील नायिका ही शिक्षिका असून तिला कुष्ठ रोग झाल्याने तिच्या वाट्याला उपेक्षित जगणं येते. तो रोग बरा

होऊनही तिला टाकून दिले जाते,अशी मांडणी केलेली आहे.त्यातून कुष्ठरोगाविषयी समाजाचा गैरसमज प्रकट केलेला आहे.

'आधारवड' कथेत बँकेत मॅनेजर असलेला नवरा, दोन मुली एक मुलगा असा तिचा संसार सुखाने चाललेला असतो. मेंदुतील रक्तस्त्रावाने तिच्या नवऱ्याचे निधन होऊन तिच्या वाट्याला वैधव्य येते.विधवेबाबत समाजाची मानसिकता, तिच्याविषयी ठरलेल्या स्त्रीविषयक परंपरा, तिला चुकीच्या वाटतात, म्हणून ती कपाळावरचे कुंकू पुसत नाही. समाज मात्र त्याबाबत प्रश्न निर्माण करतो. अर्थातच विधवा स्त्रीबाबत समाजाची मानसिकता बदलविण्यासाठी लेखिकेने परिवर्तनवादी विचार यातून मांडलेले दिसतात. 'दर्शन' कथेतील स्त्रीला निखळ आंनदाने व उत्साहाने जगायचं असतं. दुःखी उदासवाण्या लोकांपासून तिला दूर जायचं असतं. सांसारिक जीवनातील तापदायक गोष्टींविषयी विरक्त भावना ठेवणारी ही स्त्री आध्यात्मिक चिंतन व ध्यानधारणा करते.ती बाह्य जगापासून काही काळ स्वतःमध्ये विलीन होऊन जाते.

**आशा बगे** यांच्या चंदन संग्रहातील 'समुद्र' कथेत राधा आणि निरंजन दोघे लग्न करायचे ठरवितात. त्याच्या बहिणीचे लग्न झाल्याशिवाय आपले लग्न होणं अशक्य असल्याचे तो सांगतो. सुरूची नावाच्या दुसऱ्या बहिणीचा गर्भपात झाल्याने त्याच्या आईला ताण येतो. तेव्हा राधाचे योगच त्यास जबाबदार आहे, असे त्याच्या आईला व बहिण

विमलला वाटतं अर्थातच व्यक्तीच्या आयुष्यात योगायोगानेघडणाऱ्या घटनांचा सहसंबंध एखाद्याच्या पायगुणाशी लावला जातो. त्याला दुष्ट मानलेजाते,असे लोकमानस यातून प्रकट होते. 'श्राद्ध' कथेत मृत व्यक्तीच्या बाबतीत श्रद्धा व समजुती अधोरेखित केलेल्या आहेत.दोन मुले व सुना असलेली सुमनताई नवऱ्याचे श्राद्ध घालण्यासाठी प्रयत्न करते,पण नोकरीच्या कामात व्यस्त असलेल्या मुलांना व सुनांना त्यासाठी वेळ मिळत नाही. श्राद्ध, मुक्ती या सगळ्या कल्पना मानून तो त्या गोष्टींना भंकसच समजतो. अशाप्रकारे परंपराग समजुतीविषयी लेखिकेने दोन पिढ्यांमधील मनोभूमिका प्रकट केलेली आहे.

'वर्तमान' कथेतील इंजिनिअरिंगची पदवी घेतलेल्या अभिरामला सरकारी बांधकाम खात्यात कनिष्ठ अभियंत्याची नोकरी लागते. तर "माझ्या बाळाचा पायगुण" अशी त्याची बहीण म्हणते.नोकरी लागल्याबद्दल त्याचे वडील सत्यानारायण करतात. नंदाच्या डोहाळ जेवणाच्या निमित्तानं आणि त्याच्या नोकरीबद्दल चार लोक जेवायला बोलावतात. अशाप्रकारे लोकमानस व लोकसंस्कृती याचे दर्शन यातून घडते.

**कुमुद मंडलेकर** यांच्या 'जाग' संग्रहातील 'बळ' कथेत लेखिकेने बालविवाहाचे परिणाम रेखांकित केलेले आहेत. अल्प वयातच संसारात अडकविले जाते. तिच्या आईचे लग्नही वयाच्या चौदाव्या वर्षी होते. तेव्हापासून घराचे, गरीबीचे कष्ट ती उपसते आहे. हे हात जन्मभर कष्टासाठीच राबले, असे ती सांगते.'हुलकावणी' या कथेत नोकरदार, सुखवस्तु कुटुंब आणि गरीब मजूर स्त्री यांच्यातील सामाजिक व आर्थिक विषमता प्रकट होते. 'भूक' कथेतील भिकारी आईला मुलाच्या भवितव्याची काळजी वाटते. लोक भीकही देत नसल्याने तिला फार चिंता वाटते.त्यांची भूक वाढत जाते. एकीकडे भक्कम पैसा आन् दुसरीकडे अन्नाला मोताद होणारे आपण असेही वाटते. 'न्याय सर्वांना सारखा काहून नाही भेटत?' असा प्रश्न स्वतःच्या मनाला करून भिकाऱ्याचं जग नाही, हेच मग ती स्वतःला पटवत राहते. नाट लागणे, एखाद्या व्यक्तीसोबत राहून फायदा न होणे. विशेषतः स्त्रीबाबत अपशकुन मानणे, असे लोकमानसही यातून प्रकट होते.

'दान-पुण्य' कथेत मुलगी जन्माला आल्यानंतर तिच्या लग्नासाठी पैसे जमवावे लागतील, असे लोक म्हणतात,तर तिच्या लग्नाच्या वेळी कन्यादानाचे पुण्य लाभाल्याचे समाधान तिच्या वडिलांना होते. मात्र तिला कमी शिकवून लग्न केले,पण सासरच्या मंडळीने माहेरी टाकून दिले,याचा पश्चाताप होतो. लोकरूढीचे वाईट परिणाम

त्याच्या लक्षात येतात.नंतर मुलीला शिकवण्याचा विचार करून सासरी न पाठवण्याचा निर्णय घेतो. अशाप्रकारे सामाजिक रूढी-परंपरेचा कुटुंबव्यवस्थेवर होणार परिणाम यातून स्पष्ट होतो.

'देहकिनारा' या संग्रहातील 'क्लिअरन्स' या कथेत लग्नानंतर एकोणीस वर्षांनी नैना गरोदर राहते. तिची आई व भाऊ यांना खूप आनंद होतो. त्या आनंदाच्या भरात ते डोहाळे कार्यक्रमाची उत्साहाने तयारी करतात. म्हणजेच स्त्रीच्या 'बाईपणा'ची परिपूर्ती केवळ विवाह नव्हे, तर तिचं मातृत्व तिला स्त्रीत्व मिळवून देतं. त्यादृष्टीनेच समाज तिच्याकडे पाहतो. 'देहकिनारा' कथेतही जाईच्या लग्नाच्या वेळीच तिच्या सासऱ्याचं हृदयविकाराने निधन होते. पस्तीसाव्या वर्षी दुर्धर आजाराने ती मरणासन्न होते. त्यावेळी तिच्या मनात आयुष्यातील कडू गोड आठवणी रेंगाळतात. जगणं, मरणं, आपली माणसं याविषयी ती विचार करून पडून राहते. तो अक्षयतृतीयेचा दिवस होता. लग्नतिथीचा आणि पितरांना पाणी पाजायचाही. अतृप्त आत्म्यांना त्या दिवशी पूजलं नाही. म्हणून या रोगाचा शाप मला मिळाला असेल का? शाप की उःशाप, असा विचार ती करते. यातून लोकमानस प्रकट होते.

'पडसाद' संग्रहातील 'पिंडदान' कथेत श्राद्धविषयीच्या लोकसमाजुती रेखटलेल्या आहेत. म्हातारपणी तात्याच्या मुलाचे निधन होते. तेव्हा तो देवावरच चिडतो.देवाचा तिरस्कार करतो, दुःखी होतो. जगात देव नाहीच असं त्याला वाटतं. कावळा पिंडाला शिवल्याशिवाय घरी जाता येत नाही, म्हणून तो "माझ्या हातानं मी तुला मुक्त केलं. पण आता तू मला मुक्त कर रे. ये ये, पिंडाला शिव. माझ्या हातचा भात खा. तलावाचं पाणी पी आणि तृप्त हो रे." असे भाव प्रकट करतो. त्यातून मृतात्म्याविषयीचे लोकमानस प्रकट होते.

'प्रत्यय' संग्रहातील 'कढ' कथेतील नर्स असलेली माया अनुचित घडणाऱ्या गोष्टींबाबत स्वतःला दोषी मानते. "आपण अपशकुनी; जिथे नाही तिथे असाच घात करतो. आपला वावरच अशुभ ! अशुभाची सावली अशुभच घडवते. सावत्र आई आणि बाप नेहमीच म्हणायचे, "कार्टीने आई खाल्ली; जिथे जाईल तिथे सत्यानाश करेल." असा विचार ती करते. 'निर्वासित' कथेत सामाजिक रूढी, परंपरा व लोकमानस याचा स्त्रीच्या भाव जीवनावर होणारा परिणाम रेखांकित केलेला आहे. "सासूबाईच्या कडक स्वभावाची व शिस्तीचीही सवय झाली. वाड्यात पाऊल टाकल्यापासून विश्वासरावांची व तिची जवळजवळ आठवडाभर गाठ पडली नव्हती. गर्भदानाचा विधी झाल्याशिवाय नवऱ्याशी बोलायचं नाही हा म्हणे वाड्याचा दंडक." तिचा नवरा,त्याच्या आईवडीलांना घाबरून तिला भेटत नाही. कारण ते रीतिरिवाजाप्रमाणे वागतात. लग्न झाल्यानंतर नव दाम्पत्याने एकमेकांशी बोलू –भेटू नये,असे अलिखित समाजनियम यातून दिसतात. 'हेका' कथेतील अंजूला लग्नानंतर मुलबाळ झालेले नसते,म्हणून तिला मंगलपूजेचा मान मिळत नाही. शुक्रवारची सवाष्ण होता येत नाही व पुजाविधी करता येत नाही, अशी निपुत्रिक स्त्रीविषयीची लोकधारणा लेखिकेने प्रकट केलेली आहे.

**मोहना मार्डीकर** यांच्या 'तिचं आकाश' संग्रहातील 'मी माझीच' या कथेतील स्त्रीचे स्त्रीत्व आणि तिच्या अस्तित्वाविषयी लेखिकेने निर्माण केलेले प्रश्न आजच्या समाजाच्या सनातन मानसिकतेवर बोट ठेवतात. पतीशिवाय वेगळी राहणाऱ्या स्त्रीला समाज नावे ठेवतो,पण पुरुष पत्नीशिवाय राहत असेल तर त्याच्याबाबत काही बोलत नाही, अशी स्त्रीपुरुष विषमताही यातून रेखाटलेली आहे. 'बंध' या कथेतील तरुणतरुणी विवाह न करता चार वर्ष एकत्र राहतात. (लिव्ह इन रिलेशनशीप) तेव्हा त्यांना लोक नावे ठेवतात. 'कवच कुंडले' या कथेत लेखिकेने जातीय विषमतेचे चित्रण केले आहे. प्रत्येक जातीसमूहाला सामाजिक चौकटीत राहून विवाहसंस्थेची वहिवाट पाळावी लागते,या पार्श्वभूमीवर मोहना मार्डीकर यांनी जातीभेद मानणारी पुराणमतवादी सासू शेवटी हळवी होऊन परजातीच्या सुनेला स्वतःची किडणी देऊन तिला वाचवते. असे चित्रण करून जातीपेक्षा व्यक्तीच्या चांगुलपणावर प्रकाश टाकलेला आहे आणि आंतरजातीय विवाहाचे उदात्तीकरण केले आहे.

**सुमती वानखेडे** यांच्या 'जाणता अजाणता' संग्रहातील 'म्हटलं नव्हतं मी तुला!' या कथेत समाजात स्त्रीला लग्न आणि पती याशिवाय पर्याय नसतो. ती स्वतंत्रपणे आपले अस्तित्व राखून आयुष्याची वाटचाल करायचा प्रयत्न

करते, तेव्हा तिचे माहेर व सासर अशा दोन्ही कुटुंबाला सामाजिक धारणा महत्वाच्या वाटतात, म्हणून तिच्या स्वातंत्र्याला ते मान्यता देत नाही.नवरा जसा आहे,तसे त्याला स्वीकारून त्याच्याशी जुळवून घ्यायला सांगतात. 'खिडकी' कथेतील आशाकडे दवाखान्यासाठी पैसे नसतात. मधुराकडे घरकाम करणारी ही आशा एरव्ही निटनेटकी राहत असते. मात्र गरीबीमुळे तिला बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते, याची मांडणी करून लेखिका व्यक्तीच्या आर्थिक व आरोग्यविषयक समस्यांवर प्रकाश टाकतात. 'तो आणि ती' कथेतील मध्यमवर्गीय माणसांना भावाबहीणीचे शिक्षण, लग्नकार्य व घराचे बांधकाम, मुलांचे शिक्षण यांसाठी कर्जबाजारी व्हावे लागते. त्याचे हप्ते व बाकी घरखर्च यामुळे त्याचा पगार त्याला पुरा पडत नाही. इतक्या चैनीच्या वस्तू घेणे शक्य होत नाही, याचे चित्रण करताना लेखिका लिहितात. म्हणजे मध्यमवर्गीयांच्या आर्थिक समस्या लेखिकेने अधोरेखित केलेल्या आहेत.

'वेध' कथेतील तुकाराम नावाचा अल्पभूधारक शेतकरी सावकाराकडून कर्ज घेतो. सावकारी कर्जाच्या पाशात अडकतो. सावकार त्याच्या अडाणीपणाचा फायदा घेत असल्याचे त्याच्या लक्षात येते. तेव्हा त्याला प्रौढशिक्षणवर्गाचे महत्त्व कळते. त्याची पत्नी मरण पावलेली असते. मुलगी अठरा वर्षाची झाल्याने त्याला तिच्या लग्नाची चिंता लागून असते. आधीचेच कर्ज असल्याने मुलीच्या लग्नासाठी लागणाऱ्या पैशाची चिंता त्याला वाटते.म्हणजेच शैक्षणिक व आर्थिक दृष्टीने व्यक्ती सक्षम नसेल तर त्याचा परिणाम त्या कुटुंबातील लग्नाला आलेल्या मुलींच्या भावजीवनावर होतो, असे चित्र या कथेत रेखाटलेले आहे. 'त्या दोघी' या कथेतील कस्तुरी व आद्या ह्या जिवलग मैत्रिणी आयुष्यभर मैत्री कायम राहावी, म्हणून लग्न न करण्याचा निर्णय घेतात. स्त्रियांबद्दल समाज काय म्हणेल ही भीती त्यांना वाटते, पण त्याची पर्वा न करता समदुःखी स्त्रियांची मैत्रीपूर्ण संबंध राखून मोठ्या आत्मविश्वासाने आपल अस्तित्व टिकून ठेवावं आणि जगावं, असे त्या ठरवितात. 'उंबरठा' कथेतून समाजधारणा करणाऱ्या कुटुंबात स्त्रीच्या जगण्याला पडलेल्या मर्यादा अधोरेखित केलेल्या आहेत. समाजव्यवस्था व लोकांची मानसिकता स्त्रीसाठी जाचक ठरते, याची अनुभूतीही प्रकट केलेली आहे.

**अरूणा सबाने** यांच्या 'अनुबंध' संग्रहातील 'अनुबंध' कथेत सामाजिक जीवनात शैक्षणिक, आर्थिक, बौद्धिक स्वरूपात कितीही बदल झाला तरी समाजाच्या पूर्वापार असलेल्या मानसिकतेत बदल होणे शक्य नाही याबाबत विशेष भाष्य केले. 'बाईजी' कथेथील अंजूचे लग्न होऊन ती सासरी जाते. ती गरोदर राहिल्यानंतर तिची सासू 'मुलगाच झाला पाहिजे' असा आग्रह धरते. मुलगी झाली तर जीवंत ठेवणार नसल्याचे बजावून सांगते. तिचा नवराही मुलगा होण्यावरच ठाम असतो. तिला त्रासही देतो. त्यामुळे ती घाबरून जाते व मुलगा होण्यासाठी देवाकडे प्रार्थना करते, परंतु तिला मुलगीच होते. घरातील सगळे नाराज होतात. तिचा छळ सुरू करतात आणि एकदिवस तिचा नवरा तिला तिच्या मुलीसह घराबाहेर काढतो. 'वंशाचा दिवा' या समाजाच्या मानसिकतेतून विवाहित स्त्रीचा छळ होताना दिसतो.

'थांग' कथेत महिला चळवळीत काम करणारी व एकटी राहणारी तरुणी विवाहित तरूणाशी मैत्री करते.त्यांच्यात खूप जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतात,तिच्याविषयीच्या दूरसंवेदना त्याला जाणवतात.म्हणून रात्री तिचे स्वप्न त्याला पडते आणि सकाळीच तो तिच्या घरी जाऊन तिची सुखरूपता ताडून पाहतो.अर्थात स्वप्नावर विश्वास ठेवणारी माणसं साकार करून लेखिकेने लोकमानस प्रकट केलेले दिसते. 'चिरा' या कथेतील माया नावाची पंधरा-सोळा वर्षाच्या मुलीवर एका राजकीय पुढाऱ्याच लक्ष जातं आणि तो चिरा उतरवण्याचे म्हणजे एकप्रकारे लग्न करण्याचे ठरवतो. अर्थात या स्त्रियांना प्रस्थापित समाजातील पुरूषांच्या रखेल म्हणून पुर्वीपासून राहण्याची ही परंपरा आहे. त्यानुसार तिची आई त्याला मान्यता देते.याचबरोबर 'तु असता मजसवे' व 'न तुटलेली नाळ' या कथांमध्ये समाज हा तरूण आणि तरूणी यांच्या प्रेमसंबंधाना व मैत्रीला मान्यता देत नाही. त्याच्या चारित्र्याविषयी शंका घेतो, त्यामुळे त्यांना त्रास होतो, अशी मांडणी केलेली आहे.

**सीमा साखरे** यांच्या 'चार भिंतीच्या आत' संग्रहातील शीर्षक कथेतील पन्नाशीतील गुलाबराव पहिल्या दोन बायकांपासून मुलबाळ होत नाही,म्हणून संपत्तीला वारस आणि वंशला दिवा या समजुतीने वीस वर्षाच्या सरस्वतीशी लग्न करतो. तिलाही मुलबाळ होत नाही. मूल होण्यासाठी पहिली पत्नी गंगाबाई देवाला नवस करते. सरस्वतीला आठ मंगळवार करायला सांगते. म्हणजे नवस, सायास, तिथीवार यातून लोकमानस, अंधश्रद्धा लेखिकेने प्रकट केली आहे. 'झोपाळा' कथेतील दिवाळीच्या दिवशी आशाची साडी पेट घेते. "इतकी अशुभ स्त्री नको घरात." अशी तिची सासू समजते आणि तिला माहेरी टाकून द्यायला सांगते. शुभअशुभविषयक लोकभावनांचा स्त्रीच्या भावजीवनावर होणारा परिणाम यातून स्पष्ट होतो. 'पुण्यवान' कथेतही लोकमानस, लोकश्रद्धा रेखांकित केलेल्या आहेत. रावसाहेब धार्मिकदृष्ट्या पापपुण्याचा विचार करीत त्याच्या पुर्नजन्मावर विश्वास ठेवतो. लोककल्याणाची कामे करतो. सहिष्णू व परोपकाराची भावना ठेवतो. चांगले वागण्याने चांगले फळ मिळेल आणि पुनर्जन्म मिळेल,अशा धार्मिक श्रद्धा, समजुती व कल्पना त्याच्या मनात घर करून असतात. त्याच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी मुलाला वडिलांचे अंतिम सोपस्कार करायला सांगतो.

'माय'कथेतील बाप व्यसन आणि गरिबी यामुळे तो स्वतःच्या मुलांना विकतो.पत्नीला मारझोड करतो.त्यामुळे त्याचा शाळेत जाणारा मुलगा त्याचा खून करतो. म्हणजेच दारिद्र्यामुळे निर्माण होणारे कौटुंबिक प्रश्न लेखिकेने मांडलेले आहेत. 'पळवाट' कथेत एका कुटुंबाची वाताहत होताना समाजाचा व आप्तेष्टांचा कोरडेपणा लेखिका अधोरेखित करतात. 'अधिकार' कथेत एका साध्यासरळ तरूणीच्या मनामध्ये मुजोर व दृष्ट तरूणाची दहशत निर्माण होऊनही. ती समाजात बदनामी होईल, या भीतीने त्याला विरोध करीत नाही. केला तरी त्याला काही फरक पडत नाही,अशी मांडणी केलेली आहे. 'त्यादोघी' कथेतील मिरा व राधा ह्या जिवाभावाच्या मैत्रिणी एकत्र राहत असताना समाज त्यांच्या समलिंगी संबंधाबाबत चर्चा करतो. त्याची पर्वा त्या मैत्रिणी करीत नाहीत.'उशिरा सुचलेलं शहाणपण' कथेत विवाहसंस्था ही समाजमान्य असल्याने लग्नाशिवाय समाज हा स्त्रीपुरूषांच्या नात्याला मान्यता देत नाही. त्याशिवाय एकत्र राहणारे स्त्रीपुरूष, त्यांचे सारे व्यवहार प्रस्थापित व्यवस्था स्वीकारत नाही.समाज त्या स्त्रीकडे चांगल्या दृष्टीने पाहत नाही. मात्र आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलेल्या स्त्रीला समाजाची चिंता करण्याची गरज नसते, असे यातून सांगितले आहे.

**साधू मनिषा** यांच्या 'डेल्टा' संग्रहातील 'विसर्जन' या कथेत लोकश्रद्धा व लोकसमजुती प्रकट करून लग्न जुळण्यासाठी पत्रिका काढली जाते,याचे मानसचित्र लेखिकेने रेखाटले आहे.जसे- "तुझा पत्रिकेवर विश्वास आहे म्हणे. तुझी मावशी काल आईला भेटली. मी त्यांना दोष देत नाही. त्यांच्यापुढे सरळ – सरळ श्रद्धा आहे, पत्रिकेवरचा विश्वास आहे. कधी नकार द्यायला ते या कारणामागे दडतीलही. परंतु आपला कोतेपणा पत्रिकेमागे नाही लपविणार." समाजात लग्नकार्याच्या वेळी कुंडली व लग्न पत्रिका जुळल्यानंतर सोईरसंबंध केले जातात.ही वास्तविकता या कथेतून लक्षात येते. 'अंधाराचे चित्र' या कथेत आर्थिकदृष्ट्या कारुण्य वाट्याला आलेल्या कलावंताचे चित्रण करून कला आणि व्यवहार यामध्ये कलाकाराच्या वाट्याला दारिद्रय येते,अशी अनुभूती यातून प्रकट झालेली दिसते. 'हाळेद' कथेत मजूर स्त्रियांचे कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण अधोरेखित केले असून मजूर स्त्रियांच्या आरोग्याची समस्याही मांडलेली आहे. 'गुंजनबाबाचा सल्ला' या कथेत गुप्त धनाच्या बाबतीत लोकमानस प्रकट करून समाजातील अंधश्रद्धेवर प्रकाश पडलेला दिसून येतो.

## ➢ निष्कर्ष

१. विदर्भातील लेखिकांनी सामाजिक व आर्थिक विषमतेचे चित्रण केलेले आहे
२. लोकमानस, लोकश्रद्धा व लोकसमजुती यावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे.
३. वैवाहिक रूढी, परंपरा आणि धार्मिक विधी याचे दर्शन या लेखिकांच्या कथेतून घडते.
४. स्त्रिया शिक्षणविषयीचे महत्व काही लेखिकांच्या सांगितलेले आहे.

५ . स्त्रीपुरुष मैत्री किंवा तरुण-तरुणीचे प्रेमसंबंध याकडे समाज संशयाने पाहतो,असे सांगून समाजाची जुनी मानसिकता काही लेखिकांनी प्रकट केलेली आहे.

६. अनिष्ट स्वरूपाच्या सांस्कृतिक मूल्यांचा वेध या लेखिकांनी कथेतून घेतलेला आहे.

➢ **संदर्भसूची**

१. चौधरी स्नेहलात, कमल गंध, प्रथम आवृत्ती,मुंबई, शिरीष प्रकाशन, १९७५
२. कागणे मा. ना., मराठी प्रादेशिक साहित्य, आवृत्ती पहिली, औरंगाबाद, गोदावरी प्रकाशन, १९९६
३. सुप्रिया अय्यर, चांदणचुरा, प्रथम आवृत्ती, नागपूर, साहित्य प्रसार केंद्र, २००५
४ . आशिरगडे माधुरी, आई शप्पथ आणि इतर कथा,प्रथम आवृत्ती, नागपूर,आकांक्षा प्रकाशन, २०१५
५. इंगोले प्रतिमा, अमंगल युग, प्रथमावृत्ती, दर्यापूर, सोनल प्रकाशन, २०१५
६. कांबळे विशाखा संजय, गॅलक्झी, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, स्वच्छंद प्रकाशन, २०१३
७. कारखानीस मोहना संजय, जाईचा मांडव,प्रथमावृत्ती, नवघर,डिंपल पब्लिकेशन, २०१५
८. कारखानीस मोहना संजय, पैंजण, प्रथमावृत्ती, मुंबई, डिंपल पब्लिकेशन, २०१७
९. कावळे सुनिता, उसवलेलं आभाळ, प्रथमावृत्ती, वर्धा, सुयोग प्रकाशन, २००४
१०. बगे आशा, चंदन, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००७
११. मंडलेकर कुमुद, जाग, प्रथमावृत्ती, नागपूर, सुशील प्रकाशन, २००२
१२. मार्डीकर मोहना, तिचं आकाश, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २०१५
१३. वानखेडे सुमती, जाणता अजाणता, , प्रथम आवृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन, २००५
१४. सबाने अरूण**,** अनुबंध**,** प्रथम आवृत्ती, नागपूर, आकांक्षा प्रकाशन**,** २००५
१५. साखरे सीमा, चार भिंतीच्या आत, प्रथमावृत्ती, नागपूर, सीमा प्रकाशन, २००७
१३. साधू मनिषा, डेल्टा, प्रथमावृत्ती, प्रथम आवृत्ती, पुणे, संवेदना प्रकाशन, २००८